वर्ष : ०५ | अंक: ४१ | मुंबई, मंगळवार २९ ऑक्टोबर २०१९ ते सोमवार ४ नोव्हेंबर २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी केंद्रस्थानी

3 → निम्म्याच्या मर्यादा

आब राखून शिवसेना सत्तेत राहील -पवार ← 4


## भाजपने 'फिफ्टी–फिफ्टी' फॉर्म्युल्याचं वचन पाळावं: शिवसेना




**मुंबई : दिवाळीच्या धामधुमीत भाजप आणि शिवसेनेत सत्तास्थापनेसाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली असून शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांनी भाजपला पुन्हा एकदा युतीधर्माची आठवण करून दिली आहे. भाजपाध्यक्ष अमित शहा आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची लोकसभा निवडणुकीपूर्वी जी बैठक झाली होती. त्या बैठकीत 'सत्तेत फिफ्टी-फिफ्टी वाटा' हा फॉर्म्युला निश्चित झाला होता. आता त्यावर भाजपने खरे बोलायला हवे आणि आता ते वचन पाळायला हवे, असे राऊत यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. भाजपने प्रस्ताव फेटाळल्यास राष्ट्रवादीला सोबत घेऊन सत्तास्थापनेचा दावा करणार का, असे विचारले असता राजकारणात सर्व पर्याय खुले असतात, अशी सूचक प्रतिक्रिया राऊत यांनी दिली.**



महाराष्ट्रात भाजप-शिवसेना व अन्य मित्रपक्षांच्या महायुतीला सत्तास्थापनेसाठी कौल मिळाला आहे. भाजपला १०५ तर शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या आहेत. या स्थितीत सत्तेच्या चाव्या शिवसेनेकडे आल्या आहेत. भाजपपुढे सत्तास्थापनेसाठी शिवसेनेशिवाय कोणताही पर्याय नाही मात्र शिवसेनेपुढे राष्ट्रवादी व काँग्रेसला सोबत घेऊन सत्ता स्थापण्याचा पर्याय खुला आहे. त्यामुळे पुढे काय होणार, याबाबत सस्पेन्स वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी भाजपला पुन्हा एकदा जे आधी ठरलंय त्याची आठवण करून दिली आहे.




## स्वच्छ सुंदर मीरा-भाईंदर



मीरा भाईंदर पूर्व येथील धर्म काटा जवळ स्थित असणाऱ्या कस्तुरी इंडस्ट्रियल इस्टेटचा सर्व कचरा वारंवार रस्त्यावर फेकण्यात आल्याने जवळपासच्या सर्व परीसरात दुर्गंधीचे वातावरण निर्माण झालेले आहे...हा परीसर महानगरपालिकेने संपूर्णपणे दुर्लक्षित केल्याने नागरीक त्रस्त असून सगळ्यांमध्ये संतापाची लाट आहे...अनधिकृत रीत्या मोठे ट्रक आणि अवैध्य गाड्यांच्या पार्किंग मुळे आणि कचऱ्याच्या साम्राज्यामुळे रस्त्यावर चालण्याची ही नामुष्की येथील लोकांवर आलेली आहे.

सदर परिसरातील सर्व जबाबदार नेते मंडळी आपले मोठ मोठे पोस्टर व बॅनर लावण्यात अतिशय व्यस्त असल्यामुळे इथे उद्भवलेल्या या भीषण परिस्थितीचा आढावा नेमके कोणी घेईल की नाही हा एक गंभीर प्रश्न आहे. येथील लोकप्रतिनिधींनी एका ठिकाणी 'स्वछ मीरा भाईंदर, सुंदर मीरा भाईंदर' चे नारे निवडणुकीच्या रणधुमाळीत दिले आणि निवडणुका संपताच पुन्हा सर्व पूर्वपदावर येताना दिसत आहे. थोडक्यात काय तर सामान्य जनतेच्या मनात कायम निराशेची भावना निर्माण होणार....वेळीच महानगरपालिका व संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालून हा प्रश्न तातडीने मार्गी लावावा अशी येथील सामान्य जनतेची इच्छा आहे.

## पोलिसांना स्वत:वरील अन्याय जाहीरपणे मांडण्यासाठी मज्जाव

**मुंबई : करड्या शिस्तीखाली वावरत असलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अधिकारी, अंमलदारांना आता आणखी एक दंडुका लावण्यात आलेला आहे. स्वत:वरील अन्याय किंवा व्यक्तिगत गाऱ्हाणी जाहीरपणे मांडण्यासाठी मज्जाव करण्यात आला आहे. कोणत्याही प्रसारमाध्यमापुढे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्याबाबतची माहिती देता येणार नाही, अन्यथा त्यांना कारवाईच्या बडग्याला सामोरे जावे लागणार आहे.**

पोलीस दलातील अधिकारी-अंमलदार यांच्यातील हेवेदावे, वाद प्रसारमाध्यमाद्वारे चव्हाट्यावर येत आहेत. त्यामुळे खात्याची बेअब्रु होत आहे. त्यामुळे यापुढे पोलिसांना इतरांच्या तक्रारीबरोबरच पोलीस महासंचालक सुबोध जायस्वाल यांनी वैयक्तिक गाऱ्हाणी जाहीर करण्यास मनाई केली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ वा ०९(३)(ड) या नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

पोलीस दलात अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये वाद अथवा अन्याय होत असल्यास त्याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करून त्यांना कळविण्याची जबाबदारी संबंधित तक्रारदार पोलिसांवर आहे. मात्र त्याबाबत अनेक जण वरिष्ठांकडे अर्ज न देता परस्पर प्रसार माध्यामांना माहिती देतात, अनेकदा त्यांच्या तक्रारीत काहीही तथ्य नसते. जाणीवपूर्वक त्रास देण्यासाठी अशा तक्रारी दिल्या जातात. मात्र त्यास प्रसार माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने खात्याची बदनामी होत असते. अशा प्रकरणात तक्रार निष्पन्न न झाल्यास संबंधित पोलिसांवर कारवाई करण्याची तरतूद आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील अशाच प्रकरणातून एका अधिकाऱ्याची बदनामी झाल्याने त्याने त्याबाबत राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेत मुद्दा उपस्थित केला होता. त्या वेळी महासंचालक जायस्वाल यांनी यापुढे पोलिसांनी वैयक्तिक तक्रार, अन्यायाबाबतही प्रसारमाध्यमांकडे न जाता वरिष्ठांकडे दाद मागितली पाहिजे. पोलिसांनी वृत्तपत्र, आकाशवाणी अथवा अन्य माध्यमांद्वारे जाहीर भाषण किंवा सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या माहिती देता कामा नये, असे निर्देश दिले आहेत. त्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीतील उपरोक्त नियमाचा आधार घेण्यात आला आहे. सर्व पोलीस घटकप्रमुखांना या नियमावलीतील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे यापुढे पोलिसांना आपल्यावरील अन्यायासाठी वरिष्ठांकडेच गाऱ्हाणे मांडावे लागणार आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर



## मिरा-भाईंदरचे माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांच्या हत्येप्रकरणी आरोपींना जन्मठेप

मिरारोड : मीरा भाईंदरचे माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांच्या हत्येप्रकरणी आरोपी विशाल चंद्रकांत म्हात्रे, राजेश जिलेदार सिंग, कृष्णकांत उर्फअजय पांडे आणि गुलाम रसुल शेख यांना मुंबई सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. मिरा भाईंदरचे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेस नगरसेवक प्रफुल्ल पाटील यांची २०१० मध्ये हत्या झाली होती.



प्रफुल्ल पाटील यांच्या हत्येप्रकरणातील विशाल म्हात्रे, राजेश जिलेदार सिंग, अजय पांडे, गुलाम रसूल शेख या चौघाही आरोपींना मुंबई सत्र न्यायालयाने मंगळवारी २२.१०.२०१९ रोजी दोषी ठरवले होते. न्यायाधीश जयस्वाल यांनी मंगळवारी आरोपींना दोषी ठरवताना बुधवारी शिक्षा सुनावणार असल्याचे म्हटले होते.

या खटल्याचो सरकारी वकील राजा ठाकरे तर तपास अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते हे आहेत. पाटील यांच्यावर २ गोळया झाडून २८ वार केले होते. विशाल म्हात्रे याने जागेच्या वादातून राजेश सिंगला सुपारी दिली होती. राजेश सिंग हा भाईंदरचे भाजपा नगरसेवक श्रीप्रकाश उर्फ मुन्ना सिंग यांचा सख्खा भाऊ आहे. आरोपी विशाल म्हात्रे हा त्यावेळी महापौर असलेले काँग्रेसच्या तुळशीदास म्हात्रे यांचा पुतण्या आहे.

## कोठडीतील मृत्यू: सहायक पोलीस निरीक्षकासह ५ निलंबित

**मुंबई:** दोन गटांतील हाणामारीच्या घटनेवरून ताब्यात घेण्यात आलेल्या एका २६ वर्षीय तरुणाचा कोठडीत मृत्यू झाल्याने वडाळा ट्रक टर्मिनस पोलीस ठाण्यातील संबंधित पोलीस अधिकारी गोत्यात आले असून याप्रकरणाची गंभीर दखल घेत पाच जणांना निलंबित करण्यात आले आहे.


वडाळा ट्रक टर्मिनस पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि अन्य तीन कॉन्स्टेबल अशा पाच जणांना निलंबित करण्यात आले असून चौकशीअंती ही कारवाई करण्यात आल्याचे मुंबई पोलीस दलाच्या प्रवक्त्यांनी स्पष्ट केले. कोठडीतील मृत्यू म्हणून हे प्रकरण हाताळण्यात येणार आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेने तपास सुरू केला आहे, असेही त्यांनी पुढे स्पष्ट केले.




विजय हृदयनारायण सिंह या २६ वर्षीय तरुणाच्या संशयास्पद मृत्यूने खळबळ उडाली आहे. विजय सिंह हा एका औषध कंपनीत वैद्यकीय प्रतिनिधी (मेडिकल रीप्रेझेंटेटिव्ह) होता. रविवारी रात्री दोन गटांत झालेल्या मारहाणीप्रकरणी विजयला ताब्यात घेण्यात आले होते.

### नेमके काय घडले होते?

**अँन्टॉप हिल येथे रविवारी रात्री दोन गटांत हाणामारी झाली. याबाबतची माहिती मिळताच वडाळा टी टी पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहचले. दोन्ही गटातील काही जणांना पोलिसांनी पोलिस ठाण्यात आणले. गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असताना विजय सिंह याच्या छातीत दुखू लागले. त्याला तत्काळ सायन रूग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.**



# राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी केंद्रस्थानी

**मुंबई-** पाच वर्षांपूर्वी अल्पमतातील भाजपला हात देऊन सत्तेच्या सिंहासनावर बसवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसने आपले संख्याबळ वाढवून त्याच पक्षाला हतबल व्हायची वेळ आणली आहे. या आधी सत्ताधारी पक्ष म्हणून आणि त्यानंतर विरोधी पक्ष म्हणूनही दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या राष्ट्रवादीने आता राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी मुसंडी मारली आहे. पुढच्या काळात काँग्रेससोबत आघाडी करूनही सत्तेच्या राजकारणात पहिल्या स्थानावर राहण्याचा प्रयत्न राष्ट्रवादीचा राहील, असे मानले जात आहे.

मागील पाच वर्षांपूर्वी सत्तेत असतानाच, काँग्रेसबरोबर बिनसल्याने राष्ट्रवादीने विधानसभा निवडणुकीत सवतासुभा मांडला होता. सत्ताधाऱ्याच्या विरोधातील जनमत आणि मतविभाजनामुळे त्याचा दोन्ही काँग्रेसला फटका बसला व सत्तेतून पायउतार व्हावे लागले.

भाजपने लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक बिनीच्या नेत्यांना आपल्या तंबूत आणून राष्ट्रवादीला खिंडार पाडण्याचा प्रयत्न केला. लोकसभा निवडणुकीत तशी राष्ट्रवादीची सुमारच कामगिरी राहिली. त्यामुळे काँग्रेसप्रमाणे राष्ट्रवादीचे नेतेही खचले होते. मात्र पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पक्षाची सारी सूत्रे आपल्या हाती घेतली आणि संबंध महाराष्ट्र ढवळून काढला. शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी आणि सत्तेच्या अरेरावीच्या विरोधात त्यांनी भाजपच्या विरोधात युद्धच पुकारले. भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणाचा सर्वाधिक फटका बसलेल्या राष्ट्रवादीने सातारा लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक आव्हान म्हणूनच स्वीकारले आणि उदयनराजे भोसले यांचा पराभव करून भाजपला मोठा धक्का दिला. काँग्रेसच्या तुलनेत राष्ट्रवादीकडे नेतृत्वाची दुसरी फळी मजबूत आहे. शरद पवार मैदानात उतरल्यानंतर ही फळीही सक्रिय झाली. जागावाटपात फार घासाघीस न करता काँग्रेसशी जुळवून घेऊन मतविभाजन टाळण्याचा प्रयत्न राष्ट्रवादीच्या पथ्यावर पडला. मागील विधानसभेत राष्ट्रवादीचे ४१ आमदार होते. या वेळी १३ ने ही संख्या वाढून ५४ आमदार झाले आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादीला मिळालेली एकूण मते पाहता, या पक्षाने दुसरे स्थान पटकावले आहे. राष्ट्रवादीला ९२ लाख १३ हजार ४५४ मते म्हणजे १६.७१ टक्के मते मिळाली आहेत आणि ती शिवसेनेपेक्षा (९० लाख ३३ हजार ४९४ ) जास्त आहेत.

# सात लाख मतदारांनी सर्वपक्षीय उमेदवारांना नाकारले



**मुंबई-** विधानसभा निवडणुकीत मतदारांना खुश करून आपलेसे करण्यासाठी उमेदवांनी अनेक क्लृप्त्या लढवून, विविध आश्वासनांची खैरात करूनही राज्यातील सात लाख ४३ हजार मतदारांनी सर्वपक्षीय उमेदवारांबाबत अविश्वास व्यक्त करीत (यापैकी कोणीही नाही) नोटाचा पर्याय स्वीकारत आपली नाराजी व्यक्त केल्याचे समोर आले आहे. मतदानादरम्यान नोटाचा पर्याय शहरी भागातील मतदारांनी अधिक प्रमाणात स्वीकारल्याचे दिसून येत असून, लातूर ग्रामीण, पलूस कडेगाव या मतदार संघात तर विजयी उमेदवारानंतर दुसऱ्या क्रमांकाची मते नोटावर पडल्याने राजकीय पक्षांच्याही भुवया उंचावल्या आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी पार पडलेल्या मतदानादरम्यान ६१.१३ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत विविध राजकीय पक्ष आणि अपक्ष अशा ३२३७ उमेदवारांच्या राजकीय भवितव्याचा निवाडा केला होता. गुरूवारी झालेल्या मतमोजणीत अनेक मतदार संघात सुयोग्य उमेदवाराअभावी मतदारांनी नोटाचा पर्याय स्वीकारून मतदानाचे कर्तव्य बजावल्याचे समोर आले आहे. एकूण सात लाख ४३ हजार ७२० मतदारांनी नोटाचा पर्याय स्वीकारला असून सर्वाधिक २७ हजार ५०० मते लातूर ग्रामीण मतदार संघात पडली आहेत. त्या खालोखाल पलूस-कडेगाव येथे मतदार संघात २० हजार ६३१ मते नोटावर पडली असून, पनवेलमध्येही १२ हजार ३९९ मतदारांनी नोटाला पसंदी दिली आहे. तर सर्वात कमी नोटाला मते नेवासामध्ये ३१६ आणि येवलामध्ये३२६ मते पडली आहेत. 'नाशिक जिल्ह्यातील १५ मतदार संघांत नोटा (यापैकी कुणीही नाही) या पर्यायास तब्बल २० हजार ८२३ मतदारांनी पसंती दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदुत्ववादी संघटनांसह काही संस्थांनी नोटांचा वापर करू नये, असे आवाहन केले होते. काही शैक्षणिक संस्थांनी पथनाट्याद्वारे जनजागृती देखील केली होती.

# अणुशक्ती विधानसभामध्ये नवाबशाही

**मुंबई -** अणुशक्ती विधानसभेमध्ये खूप चुरशीची लढत होती. शिवसेनेचे तुकाराम काते व अपक्षांची भरमसाठ लोकांनी उमेदवारी भरली होती. पण राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार नवाब मलिक यांनी एवढ्या चुरशीच्या लढतीमधून बाजी मारली. एक शेर बाकी सब ढेर या सारखी कहावत सज्ज करत नवाब मलिक यांनी अणुशक्ती विधानसभामधून राष्ट्रवादीची सीट आणण्यासाठी खूप काटकसरीची कामे करून आपले नाव केले आहे. महाराष्ट्र नगर, मानखुर्द, चिता कॅम्प या सारख्या विभागात ते गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत असून गोर-गरीबांची कामे करतात असा तेथील स्थानिक जनतेचा कौल मिळाला. त्याचप्रमाणे भाजपा-शिवसेना-आर.पी.आय. यांची युती असलेले पक्ष शिवसेना यांचे माजी आमदार तुकाराम



काते यांना पछाडत नवाब मलिक यांनी माझ्या कामावरून माझा विजय झाला आहे असे वक्तव्य केले. त्याचप्रमाणे येणाऱ्या पुढील पाच वर्षामध्ये राष्ट्रवादी पक्षाचे कार्य आम्ही दाखवून देऊ व सामान्य जनतेच्या प्रत्येक प्रश्नाला हजर जबाबी राहू, प्रशासनाला लाजिरवाणे होऊ नये असे काम करून दाखवू व सुव्यवस्था ठेवण्याचे आतोनात प्रयत्न करू असे बोलून नवाब मलिक यांनी पुढील कामास सुरुवात केली आहे.

# शिवसेनेने मुख्यमंत्री पदावर अडीच वर्षांसाठी दावा सांगण्यात काहीच गैर नाही

**बारामती-** विधानसभेच्या निकालानंतर शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ता वाटपाच्या ५०-५० सुत्रानुसार मुख्यमंत्री पदावर अडीच वर्षांसाठी दावा सांगण्यात काहीच चुकीचे नसल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. शिवसेनेला सरकार चालवण्याचा अनुभव आहे त्यामुळे ही मागणी रास्त वाटते असंही पवार म्हणाले आहेत.

राज्यामध्ये युतीला २२० जागा मिळण्याची शक्यता युतीमधील नेत्यांनी वारंवार बोलून दाखवली होती. मात्र पवारांच्या प्रचारबळामुळे भाजपाला केवळ १०५ जागांवर विजय मिळवता आला. २०१४ साली भाजपाने १२२ जागा जिंकल्या होत्या. शिवसेनेने ५६ जागांवर विजय मिळला आहे. त्यामुळेच सत्ता स्थापनेसाठी भाजपाला शिवसेनेची मदत घ्यावीच लागणार आहे. निकालाच्या दिवशी उद्धव ठाकरेंनी घेतलेल्या पत्रकारपरिषदेमध्ये 'मी भाजपाच्या सर्व अडचणी ऐकून घेणार नाही', असं मत व्यक्त करत ५०-५० सूत्रावर कायम राहण्याचे स्पष्ट संकेत दिले होते. उद्धव यांच्या या मागणीशी आपण सहमत असल्याचे पवार यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले आहे. '१९९० च्या दशकातही शिवसेना-भाजपाने ५०-५० चे सूत्र वापरले होते. त्यांना सरकार चालवण्याचा अनुभव असल्याने त्यांनी अशा मागणीवर अडून राहण्यात काहीच चुकीचे नाही,' असं पवार म्हणाले. पवारांनी दिलेला हा संदर्भ १९९५-१९९९ काळात शिवसेनेचे मनोहर



जोशी मुख्यमंत्री झाले होते तेव्हाचा आहे. विधानसभेच्या निकालामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाआघाडीने १०२ जागांवर विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे काँग्रेसने या निवडणुकीमध्ये प्रचाराकडे दूर्लक्ष करुनही त्यांनी अपेक्षेहून चांगली कामगिरी केली आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी स्थानिक पातळीवर एकत्र काम केल्याने हे निकाल समोर आल्याचे पवारांनी म्हटले आहे. 'काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी आमच्या सोबतीने काम केले. आमच्या योग्य संवाद होता. सोनिया गांधी यांनी सभा घेतल्या नसल्या तरी राहुल गांधींनी सभा घेतल्या होत्या. मी इथला स्थानिक नेता या नात्याने पुढाकार घेत आघाडीसाठी अनेक सभा घेतल्या होत्या,' असं पवारांनी सांगितली.

प्रचारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादीमधून नेत्यांनी दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्यावरुन केलेली टीका योग्य नव्हती असं पवारांनी यावेळी बोलताना सांगितले. तसेच गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली टीकाही चुकीची होती असंही पवार म्हणाले.

# मुंबई विद्यापीठाचे २८ कोटी रुपयांचे अनुदान थकीत

**मुंबई-** मुंबई विद्यापीठाचे साधारण २८ कोटी रुपयांचे अनुदान शासनाकडून मिळाले नसल्याची माहिती समोर आली आहे. बाळासाहेब ठाकरे अध्यासन, राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान, माय मराठी प्रकल्प अशा विविध प्रकल्पांचे अनुदान अजूनही थकलेले आहे. विद्यापीठाला विविध योजनांसाठी शासनाकडून अनुदान मिळते. लेखा आणि विकास कक्षासाठी ६३ कोटी ३२ लाख ७२ हजार ९९७ रुपये अनुदान मंजूर झाले होते. प्रत्यक्षात ३५ कोटी ८२ लाख ७२ हजार ९९७ रुपये विद्यापीठाला मिळाले आहेत तर २७ कोटी ५० लाख रुपये अद्यापही मिळालेले नाहीत. बाळासाहेब ठाकरे अध्यसनासाठी ५ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यापैकी फक्त १ कोटी रुपये मिळाले असून ४ कोटी रुपये प्रलंबित आहेत. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानासाठी मंजूर झालेल्या २० कोटी रुपयांपैकी १५ कोटी रुपये मिळाले असून ५ कोटी रुपये प्रलंबित आहे. सार्वजनिक धोरण आणि अर्थशास्त्राच्या प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या २५ कोटी रुपयांपैकी अवघे साडेसहा कोटी रुपये विद्यापीठाला मिळाले आहेत. या योजनेचे १८ कोटी ५० लाख रुपये शासनाकडून येणे आहे. जर्मन विभागासाठी मंजूर करण्यात आलेल्या १ कोटी ८० लाख रुपयांच्या अनुदानांपैकी ४८ लाख २७ हजार रुपये विभागाला मिळालेले नाहीत.





# पालिकेच्या कार्यालयात प्लास्टिकच्या थाळीत भोजन

**मुंबई-** पालिकेच्या 'जी-उत्तर' विभागातील अधिकारी-कर्मचारी दुपारी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकदा वापरण्याजोग्या प्लास्टिकच्या वस्तूंवर बंदी घालण्याची घोषणा केलेली असतानाही पालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांनी बंदीयोग्य प्लास्टिकच्या थाळीतच दुपारच्या भोजनाचा आस्वाद घेतल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. ही बाब लक्षात आल्यानंतर पालिकेने प्लास्टिकच्या थाळीत जेवण पुरविणाऱ्या दोन पुरवठादारांवर अनुक्रमे पाच हजार रुपये आणि १० हजार रुपये दंड ठोठावला आहे. त्याचबरोबर कॅटरिंग कंपनीलाही २५ हजार रुपये दंड करण्यात आला आहे. या प्रकरणी तिघांवर एकूण ४० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी मोठ्या संख्येने पालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीच्या गुरुवारी पार पडलेल्या मतमोजणीच्या कामात ही सर्व मंडळी व्यस्त होती. तर दिवाळीनिमित्त पालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये शुक्रवारी छोटेखानी स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. काही कार्यालयांमध्ये वाद्यवृंदाचा, तर काही विभागांमध्ये कार्मचाऱ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर सर्व कर्मचाऱ्यांसाठी दुपारी भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली होती. 'जी-उत्तर' विभागातील स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमासाठी भोजनाचा पुरवठा करण्याची जबाबदारी याच परिसरातील एका नामांकित बेकरीवर सोपविण्यात आली होती.

# महायुतीचं सरकार येणार, लवकरच शपथविधी

## सरकार भाजपच्या नेतृत्वाखालीचः फडणवीस

**मुंबई -** महाराष्ट्रातील सत्तेत समान वाटा मिळावा, अशी मागणी करत शिवसेनेने भाजपवर दबाव टाकला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीत भाजपला सर्वात मोठा पक्ष म्हणून जनतेने कौल दिला असून पुढील पाच वर्षे भाजपच्या नेतृत्वाखालीच राज्यात महायुतीचं सरकार काम करेल, असे महत्त्वपूर्ण विधान केले आहे. महाराष्ट्रात पुढचा मुख्यमंत्री भाजपचा होणार की शिवसेनेचा होणार, याची उत्सुकता सर्वांनाच लागली असताना देवेंद्र फडणवीस यांनी केलेलं विधान राजकीयदृष्ट्या फारच महत्त्वाचं मानलं जात आहे. राज्यात आम्ही पुन्हा एकदा स्थिर सरकार देणार असून युतीचे हे सरकार ५ वर्षे भाजपच्या नेतृत्वाखाली काम करणार आहे, असे सांगून फडणवीस यांनी ५ वर्षे मुख्यमंत्रिपद भाजपकडेच राहणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. मुंबईत भाजपने आयोजित केलेल्या दिवाळी संमेलनात देवेंद्र फडणवीस बोलत होते. दिवाळीनंतर सत्तास्थापनेसाठी आवश्यक पावले उचलली जातील, असेही यावेळी फडणवीस यांनी स्पष्ट केले. जनतेने भाजप,



शिवसेना, रिपाइं, रासप, शिवसंग्राम महायुतीला सत्तेसाठी स्पष्ट कौल दिला आहे. त्याचा सन्मान आम्ही सर्वांनी राखला पाहिजे. याबाबत कोणाच्याच मनात शंका नाही, असेही फडणवीस म्हणाले. दिवाळीनंतर भाजप आपल्या विधीमंडळ पक्षनेत्याची निवड करेल. त्यानंतर नव्या सरकारचा शपथविधी सोहळा होईल, असेही फडणवीस यांनी पुढे नमूद केले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने भाजप-शिवसेना युतीला सत्तेसाठी कौल दिला असला तरी भाजप-सेनेचं संख्याबळ पाहता शिवसेना किंगमेकरच्या भूमिकेत राहणार आहे. सत्ता स्थापन करायची असेल तर शिवसेनेला सोबत घेण्याशिवाय कोणताही पर्याय भाजपकडे नाही.

# सर्वच बेस्ट कर्मचाऱ्यांना बोनसचा लाभ

मुंबई : केवळ सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करणाऱ्या बेस्ट कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर सरसकट सर्वच कर्मचाऱ्यांना बेस्ट प्रशासनाने बोनस द्यावा, या औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निणऱ्यात हस्तक्षेप करण्यास उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन खंडपीठाने शुक्रवारी नकार दिला. त्यामुळे बेस्ट कर्मचाऱ्यांना ऐन दिवाळीत दिलासा मिळाला आहे.

उच्च न्यायालयाच्या या निणऱ्याचा बेस्टच्या ३१ हजार ४६२ कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे. यापूर्वी केवळ सामंजस्य करारावर सही करणाऱ्या १५ हजार ८१३ कर्मचाऱ्यांनाच यंदा दिवाळी बोनस देण्याचे प्रशासनाने जाहीर केले होते.

त्याविरोधात कर्मचारी संघटनेने औद्योगिक न्यायालयात दाद मागितली होती. त्यावेळी औद्योगिक न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल देत सरसकट सर्वच कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देण्याचे आदेश दिले होते. या निणऱ्याविरोधात बेस्ट प्रशासनाने उच्च न्यायालयात धाव घेतली.

सुट्टीकालीन न्यायालयाचे न्यायमूर्ती एन. जे. जमादार यांच्या समोर शुक्रवारी याप्रकरणी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी बेस्ट प्रशासनाच्या या निणऱ्यामुळे कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे, असे कर्मचाऱ्यांच्या संघटनेतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. तर या आधीसुद्धा २०१६ ते २०१८ दरम्यान आर्थिक तोट्यामुळे कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात आला नव्हता, असा दावा प्रशासनातर्फे करण्यात आला. या प्रकरणाची सुनावणी तीन आठवड्यांनी होणार आहे.

# लोकसभेच्या तुलनेत शिवसेनेचा मतटक्का घटला

मुंबई : सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीतील मतांच्या तुलनेत भाजप आणि काँग्रेसच्या मतटक्क्यात फार बदल झाला नसला तरी शिवसेनेची एकूण मते आणि मतांची टक्केवारी घटली आहे. तुलनेत राष्ट्रवादीच्या मतांमध्ये वाढ झाली आहे. छोटे पक्ष आणि अपक्षांच्या मतांमध्येही वृद्धी झाली आहे. दुसऱ्या क्रमांकावरील शिवसेना आणि तिसऱ्या क्रमांकावरील राष्ट्रवादीत दोन जागांचा फरक असला तरी राष्ट्रवादीची एकूण मते सेनेपेक्षाही जास्त आहेत.



सर्वाधिक १०५ जागा जिंकलेल्या भाजपला एक कोटी ४१ लाख मते मिळाली. भाजपच्या मतांची टक्केवारी २५.७१ एवढी आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला सुमारे दीड कोटी मते मिळाली होती आणि त्यांची टक्केवारी २७.६ इतकी होती. लोकसभा निवडणुकीत शिवसेनेला १ कोटी २५ लाख मते मिळाली होती आणि त्यांची टक्केवारी २३.३ एवढी होती. विधानसभेत शिवसेनेला ९० लाख, ४९ हजार मते मिळाली. त्यांची टक्केवारी १६.४१ इतकी आहे. तिसऱ्या क्रमांकावरील राष्ट्रवादीला ९२ लाख १६ हजार मते मिळाली असून त्यांची टक्केवारी १६.७१ आहे. राष्ट्रवादीपेक्षा शिवसेनेला दोन जागा जास्त मिळाल्या असल्या तरी राष्ट्रवादीची एकूण मते शिवसेनेपेक्षा जास्त आहेत. लोकसभेच्या तुलनेत राष्ट्रवादीच्या मतांमध्ये वाढ झाली. लोकसभेत राष्ट्रवादीला १५.५ टक्के (८३ लाख, ८७ हजार) मते मिळाली होती. लोकसभा आणि विधानसभेतील काँग्रेसच्या मतांमध्ये फारसा बदल झालेला नाही. विधानसभेत ४४ जागा मिळालेल्या काँग्रेसला १५.८७ टक्के मते (८७ लाख, ५२ हजार) मिळाली आहेत. लोकसभेच्या वेळी फक्त एक जागा मिळालेल्या काँग्रेसला १६.३ टक्केमते मिळाली होती.

वंचित आघाडी, अपक्ष किंवा छोट्या पक्षांना एक कोटी मते मिळाली आहेत. त्यांची टक्केवारी १८.६२ एवढी आहे. छोटे पक्ष, अपक्ष आणि इतरांना लोकसभेत १४.६ टक्के मते मिळाली होती.

पृष्ठ १ वरुन

## पोलिसांना स्वत:वरील अन्याय जाहीर जाहीरपणे मांडण्यासाठी मज्जाव

### तोंड दाबून बुक्क्याचा मार

पोलिसांना आपल्यावरील अन्याय केवळ वरिष्ठांकडेच मांडण्याची सूचना महासंचालकांनी दिली आहे, मात्र बहुतांश वेळा अधिकाऱ्यांकडून संबंधित तक्रारीवर योग्य कार्यवाही केली जात नाही, पक्षपातीपणा करून तक्रारदारावर अन्याय केला जातो. त्यामुळे नाइलाजास्तव प्रसारमाध्यमाकडे धाव घेतली जाते. मात्र आता त्यावर निर्बंध घातल्याने पोलिसांना आता 'तोंड दाबून बुक्क्याचा मार' सहन करण्याची वेळ आली आहे. त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा घालण्यात आल्याची चर्चा पोलीस वर्तुळात होत आहे.

# खचलेल्या काँग्रेसला निकालाने उभारी

**मुंबई- लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर पार खचून गेलेल्या काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत चांगली उभारी आली आहे. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात राग व्यक्त करण्यासाठी मतदारांनीच काँग्रेसला हात दिला. राज्याच्या राजकारणात पहिल्या स्थानावर राहिलेल्या काँग्रेसला आता चौथ्या स्थानावर जावे लागले. मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे पुढे जाणे हेही काँग्रेसपुढे भविष्यातील आव्हान राहणार आहे.**

पंधरा वर्षे सत्ता भोगणारा काँग्रेस २०१४ च्या एका पराभवानेच



गलितगात्र झाला. भाजप-शिवसेनेच्या सत्ताकाळातील पाच वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही पक्षाची सुमार कामगिरीच राहिली. सत्ता गेल्यानंतर मुख्यमंत्रिपद, मंत्रिपदे उपभोगलेले नेतेही हातबल झाले होते. लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवाने पक्षाचे जे काही नेते आहेत, तेच पुरते खचून गेले. पक्षाची धुरा सांभाळायला धाडसाने कुणी पुढे येईना. अशा परिस्थीत बाळासाहेब थोरात यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. मात्र आपण स्वत: तरी निवडून येऊ की नाही, याचीच सगळ्याच नेत्यांना धाकधूक होती. त्यामुळे आपापला मतदारसंघ किंवा फार तर जिल्हा या पलीकडे नेतेही जाऊ शकले नाहीत. केंद्रीय नेतृत्वानेही महाराष्ट्रसारख्या महत्त्वाच्या राज्याकडे जवळपास दुर्लक्षच केले. राहुल गांधी यांचा दोन दिवसांचा दौरा आणि पाच सभा झाल्या. भाजप नेतृत्वाच्या तुलनेत ते नगण्यच होते.

मतविभाजन टाळण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर केलेली आघाडी ही काँग्रेसची जमेची बाजू ठरली. शेतकऱ्यांचे प्रश्न व वाढती बेरोजगारी यामुळे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जनमत तयार होत होते. त्याचा काही प्रमाणात काँग्रेसला फायदा झाला. मागील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला ९४ लाख ९६ हजार ९५ म्हणजे १८ टक्के मते मिळाली होती व ४२ जागा मिळाल्या होत्या.

## संपादकीय...

# ‘मॅन ऑफ द मॅच’



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

पराभूत संघातील खेळाडूचा विचार ‘मॅन ऑफ द मॅच’साठी केला जात नसतो, परंतु २०१९ च्या विधानसभा निकालात मात्र पराभूत विरोधी आघाडीच्या यशाचे, एकहाती लढत देणारे शिल्पकार शरद पवार यांना हा पुरस्कार मतदारांनीच बहाल केला आहे. राज्यात पाच वर्षे सत्ता राबवलेल्या युतीला विजय मिळूनही त्या विजयाचे समाधान नाही आणि काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी पराभूत होऊनही त्यांच्या पाठीराख्यांमध्ये मात्र विजयी झाल्याची भावना आहे. कारण या निवडणूक निकालांनी आधी व्यक्त करण्यात आलेल्या शक्यतांचा पार ‘निकाल’ लावला आहे. शरद पवार यांची इडी चौकशी होणार असल्याची हूल उठवू देऊन संभ्रम निर्माण करण्याचा केला गेलेला प्रयत्न हा विरोधकांच्या दृष्टीने इष्टापत्ती आणि ‘टर्निंग पॉइंट’ ठरला. पवारांनी या चौकशीचे दोर धरूनच आघाडीला यशाचा मार्ग दाखवला. मतदानाला दोन दिवस उरले असताना पवारांनी भर पावसात साताऱ्यात केलेले भाषणही तेवढेच उपयोगाला आले. लांबलेल्या पावसाने कदाचित शेतकऱ्यांना फटका दिला असेल परंतु पवारांना त्याने मोठाच हात दिला. त्या भाषणांमुळे आलेल्या सहानुभूतीच्या पुरात ‘सातारचे राजे’ वाहून गेले. गुरुवारी मतदानाचा कौल स्पष्ट होताच ’काँग्रेस-राष्ट्रवादी आणि शिवसेना एकत्र येऊन सत्ता स्थापन करू शकतील’ अशा वावड्या उठू लागल्या होत्या. २०१४ च्या विधानसभा निकालांच्या वेळी पवारांनी केलेली खेळी त्यामागे होती. राज ठाकरे यांच्या पक्षाला निवडणुकीत यश मिळाले नाही. परंतु, ‘राज्यात मजबूत विरोधी पक्ष हवा’ हे त्यांचे मत मात्र मतदारांनी उचलून धरले. राजकीय विश्लेषकांचे अंदाज, सोशल मीडिया यांतून युतीचा जोर दिसत होता. त्याला लोकसभेच्या यशाची पार्श्वभूमी होती. विरोधकांनी जणू आधीच पराभव स्वीकारला आहे की काय असे वातावरण राज्यात होते. केंद्रातही काँग्रेस नेतृत्वहीन झाल्याचे दिसत होते. त्यामुळे, काँग्रेसचा राज्यातला विरोधी पक्षनेताच थेट पलीकडे उडी मारून गेला. पाठोपाठ आणखीही काही नेत्यांनी राजकीय संरक्षणासाठी पक्षबदलाचा मार्ग स्वीकारला. ‘राष्ट्रवादी’तही काहीसे असेच वातावरण होते. त्यातच अजित पवारांच्या चौकशीच्या आणि गृहकलहाच्या बातम्यांनी भर घातली. परंतु ‘इडी’ चौकशीचा डाव उलटवताना मिळालेल्या पाठींब्यामुळे पवारांना ’खेळपट्टी’चा अंदाज आला आणि मग त्यांनी मैदानावर चौफेर नजर फिरवून विरोधकांच्या फिल्डिंगचा नेमका अंदाज घेतला. पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादीचा खरा गड लोकसभेत ढासळला होता. पवारांच्या धुवाँधार खेळीमुळे तो विधानसभेत त्यांनी परत मिळवलाच, शिवाय काँग्रेसच्या पिचकलेल्या फुग्यातही यशाची हवा भरली. पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादीने २०१४ पेक्षाही अधिक जागा मिळवत मराठवाड्यातली स्वतःची ताकद कायम राखली. ‘राष्ट्रवादी’ आहे तेवढ्या जागासुद्धा राखू शकेल की नाही अशी स्थिती असताना पक्षाने तो आकडा ओलांडून काँग्रेसपेक्षाही अधिक जागा मिळवतानाच विदर्भातही आपली ताकद वाढवली.



काँग्रेसच्या प्रचाराची स्थिती तर खूपच वाईट होती. नव्या प्रदेशाध्यक्षांना नगर जिल्ह्यावर लक्ष केंद्रित करावे लागले आणि अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण यांना अनुक्रमे भोकर आणि दक्षिण कऱ्हाडमध्येच ठिय्या मांडावा लागला. राज्यस्तरावर काँग्रेसचा एकही नेता पक्षाच्या वतीने काही बोलत आहे अथवा विरोधकांना उत्तर देत आहे, असे कुठे दिसत नव्हते. मुंबईत तर मिलिंद देवरा आणि संजय निरुपम यांच्यातील वादाच्या तुताऱ्याच सतत वाजत होत्या. काँग्रेसमुक्त भारताचा ध्यास भाजपपेक्षा काँग्रेसनेच अधिक घेतला आहे की काय, असे वाटण्याजोगी स्थिती होती. या परिस्थितीत मतदारांनी काँग्रेसला दिलेले यश लक्षणीय आहे. विदर्भाने आपले पूर्वापार काँग्रेसप्रेम राखत २०१४पेक्षा अधिक जागांचे दान काँग्रेसच्या पदरात घातले तर पश्चिम महाराष्ट्र हा विरोधकांचा गड असल्याचा समज भक्कम करीत तिथेही काँग्रेसने चांगली कामगिरी केली. मुंबई भाजप-सेनेच्या ताब्यात गेली असल्याचे चित्र असताना काँग्रेसने तिथेही किमान आपले अस्तित्व दाखवले. भाजप आणि मोदी अपराजेय आहेत, अशी प्रतिमा निर्माण झाली होती. तिला या निकालांनी छेद दिला आहे. सत्तेपुढे शहाणपण चालत नसले तरी निवडणुकीच्या राजकारणात ‘राजकीय अनुभव आणि हुषारी’ मात्र तग धरू शकते, हा या निकालांचा अर्थ आहे.

# निम्म्याच्या मर्यादा



राजकारणात उपयुक्ततेइतकेच उपद्रवास महत्त्व असते हे विदित आहेच. पण आपल्या या ताकदीचा परिणामकारक उपयोग करण्यासाठी विवेकाचीदेखील तितकीच आवश्यकता असते, याकडे मात्र दुर्लक्ष होते. या दोहोंतील काही एकच असेल, तर संतुलन बिघडते. म्हणजे समोरच्यास नुसत्या उपयुक्ततेचेच दर्शन झाल्यास ‘वापरा आणि फेकून द्या’ असे होण्याची शक्यता अधिक. तसेच नुसती उपद्रवक्षमता दिसल्यास अशा किरकिऱ्यांकडे दुर्लक्ष करण्याकडे संबंधितांचा कल असतो. अशा केवळ तक्रारखोर इसमाच्या हाती फारसे काही लागत नाही. या सर्व विवेचनाचा संदर्भ पंख छाटणाऱ्या या निवडणूक निकालानंतर शिवसेनेने आपला सहकारी पक्ष असलेल्या भाजपस पन्नास टक्क्यांची करून दिलेली आठवण. याचा अर्थ यापुढे सत्तेत उभय पक्षांना निम्मा निम्मा वाटा हवा, ही शिवसेनेची इच्छा. यात सर्व काही आले. म्हणजे महत्त्वाच्या खात्यांची वाटणी आली आणि मुख्यमंत्रिपदाचीही प्रत्येकी अडीच वर्षे अशी विभागणीही आली. सेनेची ही मागणी भाजप तशीच्या तशी मान्य करणार किंवा काय, हा त्या दोहोंतील प्रश्न. तो जोपर्यंत सार्वजनिक होत नाही, तोपर्यंत त्याची उठाठेव अन्यांस करण्याचे कारण नाही. तथापि यानिमित्ताने दोन राष्ट्रीय पक्ष, त्यांचे राज्यातील दोन मित्रपक्ष आणि या उभयतांतील संबंध यावरील भाष्य करणे उचित ठरेल. तसे ते करावयाचे कारण त्यात महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा दडलेली आहे.

पहिली जोडी म्हणजे सत्ताधारी राष्ट्रीय भाजप आणि त्यांचा प्रादेशिक सहकारी शिवसेना. कोणत्याही प्रदेशाची अस्मिता हे त्या-त्या प्रदेशातील स्थानिक पक्षाच्या राजकारणाचे मर्म असते. तमिळनाडूतील द्रमुक/अण्णा द्रमुक, आंध्रातील तेलुगू देसम, शेजारची तेलंगणा राष्ट्र समिती, बंगालची तृणमूल, ओदिशाचे बिजू जनता दल असे अनेक प्रांत आणि त्यांचे पक्ष यांचे दाखले देता येतील. यातील जवळपास सर्वच पक्षांना आपापल्या प्रांतात स्वबळावर राज्य करण्याची संधी किमान एकदा तरी मिळालेली आहे. ती तशी त्यांना मिळू शकते, या बळावरच अन्य स्वघोषित राष्ट्रीय पक्ष या स्थानिक पक्षांशी हातमिळवणी करतात वा दोन हात करतात. तथापि महाराष्ट्रातील शिवसेनेच्या बाबत असे कधी घडलेले नाही. तेव्हा आपल्या पक्षास हा सत्तास्थापनेचा मान मिळायला हवा, अशी त्या पक्षाची भावना असेल तर ती रास्त ठरते. पण तिचा आदर केला जाईल का, हा यामागील महत्त्वाचा मुद्दा. तो नकारात निघण्याची शक्यता अधिक. हे असे का?

कारण स्वबळावर सत्तास्थापनेची संधी शिवसेनेस आतापर्यंत कधीही साधता आलेली नाही, म्हणून. अन्य प्रादेशिक पक्षांप्रमाणे शिवसेनेस आपला पसारा राज्यभर वाढवता आलेला नाही. यामागचे साधे कारण म्हणजे शिवसेना आपल्या मराठी अस्मितेचे दर्शन घडवू शकलेली नाही आणि तिला स्वत:च्या बळावर कधीही सत्ता स्थापन करता आलेली नाही. उघडपणे भले हा पक्ष फक्त भाजपशीच हातमिळवणी करीत आला असेल. पण पडद्यामागचे चित्र तसे नाही. साठच्या दशकात सेनेने काँग्रेसचा छुपा पाठिंबा मिळवला पण नंतर भाजपशी घरोबा केला. यामुळे सेनेचे सत्त्व क्षीण होत गेले. आताच्या निवडणुकीत हेच दिसून आले. निकालानंतर सेना सत्तेत निम्मा वाटा मागते. पण हीच मागणी आणि तिला ताठ कण्याची जोड निवडणुकीआधी भाजपसमवेतच्या चर्चेत मिळाली असती, तर चित्र वेगळे असते. हा ताठपणा कोणत्याही मुद्द्यावर सेनेस दाखवता आलेला नाही. ‘आरे’सारख्या मुद्द्यावरची सेनेची भूमिका हा त्या पक्षाच्या निष्प्रभतेचा आविष्कार होता. परिणामी जो हक्क ठरला असता, त्यासाठी प्रतीक्षेची वेळ सेनेवर आली.

याउलट परिस्थिती राष्ट्रीय पक्षाची कागदोपत्री मान्यता असूनही राज्यात प्रादेशिक पक्षासारखेच राजकारण करणारा राष्ट्रवादी काँग्रेस आणि मूळ काँग्रेस यांच्या संबंधांची. सेनेचा जन्म साठच्या दशकातील, तर राष्ट्रवादी १९९९ सालातील. म्हणजे तुलनेने लहान. सेना-भाजप संबंधाप्रमाणे राष्ट्रवादी आणि तिचा उद्गाता काँग्रेस यांच्यातील संबंधदेखील फार काही सौहार्दाचे होते असे नाही. पण या दोघांनी १९९९ ते २०१४ अशी सलग १५ वर्षे राज्य केले. त्या तुलनेत १९९५ ते ९९ ही भाजप आणि सेना यांच्यातील पहिली सत्ता अल्पजीवी ठरली. त्यानंतर २०१४ साली हे दोन्ही पक्ष पुन्हा सत्तेवर आले. तोपर्यंत या दोन्ही पक्षांची बरीच फाटाफूट अनुभवून झाली होती. सेना आणि भाजप यांच्याप्रमाणेच काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांची मतपेढी एकच आहे आणि या दोन्ही पक्षांनी मधल्या काळात हंगामी घटस्फोटदेखील घेतला. गेली निवडणूक या दोघांनीही स्वतंत्रपणे लढवली. पण नंतर हे दोघे पुन्हा एकत्र आले. सेनेनेही काही काळ भाजपशी काडीमोड घेऊन पाहिला; पण तीन आठवड्यांच्या जीवघेण्या प्रतीक्षेनंतर त्या पक्षाचा धीर सुटला आणि मिळेल त्या खात्यांवर त्या पक्षास समाधान मानावे लागले. त्यानंतर बराच काळ सेनेचे मंत्री राजीनामे खिशात घेऊन हिंडत होते असे म्हणतात. पण कधीच दिल्या न जाणाऱ्या राजीनाम्यास काहीही मोल नसते. सेनेच्या राजीनाम्यांचे असेच झाले.

याउलट घटस्फोटानंतरच्या सहजीवनाच्या या महत्त्वाच्या काळात या दोन्हीही काँग्रेसच्या शीर्षस्थ नेत्यांनी आपापल्या वाणीस लगाम घातला आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यास कमी लेखण्याचा उद्योग केला नाही. हे पथ्य सांभाळले जात आहे याची खात्री झाल्यावर मात्र या आघाडीची सूत्रे पवार यांनी आपल्या हाती ठेवली. पवार यांनी झंझावाती प्रचार केला. कसा, ते सर्वांनी पाहिले. पण त्यामागील या दोन्ही पक्षांच्या संबंधांचे न दिसलेले समीकरण समजून घ्यायला हवे. दरम्यानच्या काळात अजित पवार यांना काहीएक उपरती होऊन, काकांस पडणारे कष्ट पाहून त्यांचे मन भरून आले. त्या वेळच्या त्यांच्या अश्रुकांडाच्या प्रवाहात काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी वाहून जाते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली. पण ते टळले. त्यामागेही पवार यांनी मुत्सद्दीपणे केलेली पक्षहाताळणी आहे.

त्यानंतर प्रचार यंत्रणेतील आपले मध्यवर्ती स्थान पवार यांनी कधीही सैल होऊ दिले नाही. उलट आपल्या मागे त्यांनी काँग्रेसला येण्यास भाग पाडले. एका बाजूला सेना ही भाजपच्या मागे फरफटत जात असताना, तिकडे राष्ट्रवादीच्या मागे जाण्याची वेळ काँग्रेसवर आली. हे राष्ट्रवादीच्या नेतृत्वाचे यश. शिवसेना आपल्या राष्ट्रीय जोडीदारामागे खेचली जात असताना, दुसरा राष्ट्रीय पक्ष काँग्रेस हा त्याच्या प्रादेशिक जोडीदाराबरोबर दुय्यम भूमिका स्वीकारत होता. याचा परिणाम असा की, उद्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीस समजा सत्तास्थापनेची संधी मिळाली, तर चालकाच्या भूमिकेत कोण असेल हे स्पष्टच आहे. हा फरक डोळ्यांत भरणारा आहे.

परीक्षेस सामोरे जाताना शंभर टक्के गुणांची तयारी आणि लक्ष्य असल्यास बरे यश मिळू शकते. पण उद्दिष्टच पन्नास टक्क्यांचे असेल, तर प्रत्यक्ष गुण त्यापेक्षा कमीच मिळण्याचा धोका असतो. सेनेसमोर तो आ वासून उभा आहे. त्यातून कसा मार्ग काढणार, यावर त्या पक्षाचे भवितव्य ठरेल.

# १६० उमेदवारांची अनामत रक्कम जप्त

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा निकाल गुरुवारी जाहीर झाला. या निवडणुकीत २१३ पैकी १६० उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. त्यामध्ये काँग्रेस, मनसे, वंचित बहुजन आघाडी, बसपा, बहुजन मुक्ती, संभाजी ब्रिगेड या पक्षांच्या उमेदवारांचा समावेश आहे. या उमेदवारांना अनामत रक्कम वाचविण्या इतकीही मते मिळविता आलेली नाहीत.



ठाणे जिल्ह्यात १८ विधानसभा मतदारसंघाची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीसाठी ३७२ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननी प्रक्रियेत २५१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते, मात्र त्यापैकी ३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे २१३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले होते. त्यामध्ये शिवसेना, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, मनसे, सपा, वंचित आघाडी, इतर पक्ष आणि अपक्ष उमेदवारांचा समावेश होता.

जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये २१३ उमेदवार निवडणूक लढवीत असले तरी प्रत्यक्षात मात्र, ३० ते ४० उमेदवारांमध्येच चुरशीची लढत रंगली होती. त्यामुळे उर्वरित उमेदवारांची अनामत रक्कम

जप्त होणार असल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू होती. असे असतानाच निवडणुकीच्या निकालानंतर २१३ पैकी १६० उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. अनामत रक्कम जप्त झालेल्या उमेदवारांची संख्या मोठी असल्याने राजकीय वर्तुळात आता वेगवेगळी चर्चा रंगली आहे.

# मीरा-भाईंदरमध्ये बेशिस्तांना दंड

**वसई** - मीरा-भाईंदरमधील बेशिस्त वाहनचालकांकडून वाहतूक पोलिसांनी सहा महिन्यांत एक कोटी १० लाख इतका दंड वसूल केला आहे. चार हजार ८७६ वाहनचालकांवर कारवाई करत हा दंड वसूल करण्यात आला आहे. यानंतर वाहतुकीचे नियम पाळण्यास मीरा-भाईंदरमधील वाहनचालकांना सक्ती करण्यात काही प्रमाणात यश आल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले. मीरा-भाईंदर परिसरात चारचाकी आणि दुचाकी वाहनांच्या वापरात वाढ झाली आहे. त्यात बेशिस्त वाहनचालकांमध्येही वाढ झाली असून, त्यांच्यावर लगाम लावण्यासाठी वाहतूक पोलिस सज्ज झाले आहेत. काशिमिरा वाहतूक विभागाकडून हेल्मेटसक्ती, वाहने वेगाने चालविणे, सिग्नल तोडणे, सीटबेल्ट न लावणे, ट्रीपल सीट, नो पार्किंगमध्ये वाहने उभी करणे, मोबाइलवर बोलणे, ड्रंक अँड ड्राइव्ह, अवैध्य प्रवासी, चुकीच्या दिशेने गाडी चालविणे अशा प्रकारच्या वाहतुकीच्या नियमांचे भंग करणाऱ्यांकडे प्रामुख्याने लक्ष दिले जात आहे. तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्याकरिता सतत विविध मोहिमा राबवण्यात येत आहेत. काशिमिरा वाहतूक पोलिसांतर्फे अनेक महिन्यांपासून राबवण्यात आलेल्या मोहिमेमुळे सहा महिन्यांत



एकूण चार हजार ८७६ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. यामधून एक कोटी १० लाख इतका दंड वसूल करण्यात आल्याचे वरिष्ठ वाहतूक पोलिस निरीक्षक अनिल पवार यांनी सांगितले. यामध्ये मुख्यतः हेल्मेटचा वापर न करणाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले. मीरा-भाईंदर शहरातील नागरिकांमध्ये वाहतूक कायदे व हेल्मेट घालण्याविषयी विषयी जनजागृती होण्याकरिता शहरात सर्वत्र वाहतूक शाखेमार्फत जनजागृती मोहीम राबण्यात येत आहे. शहरात ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. गोल्डन नेस्ट, सिल्वर पार्क, रॉयल कॉलेज, शिवरगार्डन अशा वेगवेगळ्या ठिकाणी १० ते १२ या संख्येने वाहतूक पोलिसांचा फौजफाटा नियमित तैनात करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे शहरात हेल्मेट वापरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून जवळपास ८५ टक्के वाहनचालक आता हेल्मेट वापर करत असल्याचे पवार यांनी सांगितले. भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी राज्यात ई-चलान सेवा कार्यान्वित करण्यात आली. यात चालकाने वाहतुकीचा नियम मोडल्यास आणि खिशात पुरेसे पैसे नसल्यास चालकांना दंडाची रक्कम थेट डेबिट किंवा क्रेडिट कार्डद्वारे भरता येते. मात्र सध्याच्या डिजिटल युगात सरकार डिजिटल पद्धतीने दंड भरण्यास आग्रही असली तरी मध्ये सर्वांत जास्त दंड हा रोकडीने भरण्यात आला आहे. १६ लाख दंड कार्डद्वारे भरण्यात आला असून, ९६ लाख दंड हा रोखीने भरण्यात आला आहे.

# भाजप कार्यालयालाच ‘अच्छे दिनां’ची प्रतीक्षा

**नवी मुंबई** - नवी मुंबईमधील ऐरोली आणि बेलापूर या दोन्ही मतदारसंघांत कमळ फुलले असून शहरात आता भाजपची सत्ता वाढली आहे. त्यामुळे आता तरी भाजपचे नवी मुंबईतील मुख्यालय असलेल्या वाशी सेक्टर १५मधील कार्यलायाचे नूतनीकरण होऊन त्याला उभारी मिळेल का, असा प्रश्न कार्यकर्त्यांसमोर पडला आहे. भाजपच्या या कार्यालयाला पाणीगळतीची समस्या असून डागडुजीअभावी कार्यलयाची पडझड होऊ लागल्यामुळे सहा महिन्यांपासून कार्यालय बंद आहे.

नवी मुंबईतील वाशी सेक्टर १५ परिसरात १९८५मध्ये भाजपच्या या मुख्यालयाची उभारणी करण्यात आली आहे. दहा वर्षांपूर्वीपर्यंत या कार्यालयात अनेक कार्यकर्ते कार्यरत होते. पालिकेत नगरसेवक नसतानाही भाजपच्या कार्यकर्त्यांनी विविध आंदोलने, सामाजिक विषयांवर भाष्य करत पक्षवाढीसाठी प्रयत्न केले, मात्र दहा वर्षांपूर्वी भाजपचे अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सहभागी झाले आणि या कार्यालयालाही घरघर लागली. त्यातही काही ठराविक कार्यकर्ते या कार्यालयातून बैठका घेत असत, मात्र वेळोवेळी या कार्यलयाची दुरुस्ती आणि देखभाल न झाल्याने या कार्यलयाचा रंगही फिका पडला आहे. बांधकाम खिळखिळे झाले आहे. पावसाळ्यात पाणी गळू लागल्याने सहा महिन्यांपासून हे कार्यालय बंदच आहे.

या कार्यलयाच्या भिंतीची पडझड झाली आहे. प्रवेशद्वाराजवळचे कुंपणही गंजले आहे. सगळीकडे भाजपची कार्यालये फाइव्ह स्टार झाल्याची चर्चा असताना नवी मुंबईसारख्या स्मार्ट सिटीमधील कार्यालयाची अवस्था अशी दयनीय का, असा प्रश्न भाजप कार्यकर्त्यांना पडला आहे. यावेळी नवी मुंबईत दोन्ही आमदार भाजपचे निवडून आल्यामुळे आता तरी या कार्यालायाला अच्छे दिन येतील, अशी अपेक्षा कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.

# राज्यात ‘एफडीए’च्या कारवाया थंडावल्या



***ठाणे - अन्न आणि औषध प्रशासनातील अधिकारी विधानसभा निवडणुकीच्या कामात गुंतल्याने ऐन दिवाळीत अन्नपदार्थांचे नमुने घेणे, चाचणी करणे तसेच संशयावरून छापे टाकण्याची कामे थंडावली होती. विशेष म्हणजे दिवाळीत मोठ्या प्रमाणावर अन्नपदार्थांची खरेदी-विक्री होते. त्यामुळे अन्नपदार्थांमध्ये भेसळ होण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने एफडीएच्या अधिकाऱ्यांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र करणे गरजेचे होते. मात्र, निवडणुकीच्या कामात अडकलेल्या एफडीएच्या अधिकाऱ्यांना कारवाईसाठी तितका वेळच मिळाला नसल्याचे चित्र होते.***

सण, उत्सवामध्ये विशेष करून मिठाईची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणावर होते. दिवाळीमध्ये मिठाईसह फराळ बनविण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांची खरेदी नागरिक करत असतात. तेलापासून इतर अन्नपदार्थांना मागणी अधिक असल्याने याचाच गैरफायदा उचलत विक्रेत्यांकडून भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्री होऊ शकतात. या भेसळीमुळे आरोग्यास अपाय होण्याची शक्यता असते. त्यामुळे वेळीच भेसळ ओळखून संबंधित विक्रेत्यांवर कारवाई केल्यास भेसळखोरांवर वचक येईल. त्यासाठी कारवाई होणे गरजेचे असून अगोदरच कारवाईबाबत अन्न आणि औषध प्रशासन उदासीन आहे. कर्मचारी कमी असल्याचे कारण देत कारवाईस टाळाटाळ करत आहेत. यामुळे भेसळखोरांना अभय मिळत आहे. नुकतेच समोर आलेल्या लाचखोरीच्या प्रकरणानंतर एफडीएच्या कारभाराविषयी शंका निर्माण झाली असताना विधानसभा निवडणुकीच्या कामाची जबाबदारी अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आल्याने दरवर्षी दिवाळीच्या अगोदर एफडीएकडून राबवण्यात येणाऱ्या विशेष मोहिमेवर पाणी पडले आहे. दिवाळीत अन्नपदार्थांच्या खरेदीचा उच्चांक गाठला जात असल्याने दिवाळीच्या काही दिवस अगोदर बाजारातील अन्नपदार्थांचे नमुने घेतले जातात. परंतु यंदा निवडणुकीमुळे नमुने घेण्याचे काम काही प्रमाणात थंडावले असल्याचे समजते. बहुतेक कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यग्र होते. त्यातूनही वेळ मिळाल्यास नमुने घेण्यात येत होते, असेही सांगितले जात आहे. मात्र ज्या पद्धतीने काम होणे गरजेचे होते, तसे झाले नसल्याने भेसळखोर मोकाट असल्याचे दिसत आहे.

# वाशीत गर्दुल्ल्यांचा धुडगूस

## हाणामारीत दोघे जण जखमी; पोलिसांचे दुर्लक्ष

नवी मुंबईतील पालिका उद्याने, खाडीकिनारे आणि निर्जन रस्त्यांवर अमली पदार्थ विकणाऱ्यांचे प्रमाण वाढू लागले आहे. वाशीच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जनरल अरुणकुमार वैद्य उद्यानात रात्री हे अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांची एका टोळीत हाणामारी झाल्याने दोन जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही पालिका आणि खासगी शाळांच्या बाहेरही ही विक्री होत असल्याचे आढळून आले आहे.

नवी मुंबईत शाळा, महाविद्यालयांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे या शहरात काही काळासाठी (प्लोटिंग पॉप्युलेशन) राहण्यास येणाऱ्यांची संख्या दोन लाखांच्या आसपास आहे. यात ग्रामीण भागात भाड्याने वा घर विकत घेऊन राहणाऱ्या नायजेरियन नागरिकांची संख्या मोठी आहे. हे नागरिक अमली पदार्थांचे सेवन आणि विक्री मोठ्या प्रमाणात करीत असल्याचे अनेकदा पोलिसांना आढळून आले आहे, मात्र पोलिसांच्या कारवाईला दाद न देणारे हे नागरिक सातत्याने ग्रामीण रहिवासी, महाविद्यालयीन तरुण आणि शालेय विद्यार्थ्यांना अमली पदार्थांची विक्री करीत आहेत. यात एमडी आणि ‘म्याव म्याव’ या दोन अमली पदार्थांची सर्रास विक्री केली जाते.म्याव म्यावसाठी शालेय विद्यार्थ्यांना लक्ष केले जात आहे. या अमली पदार्थाचा गंध पालकांनाही येत नसल्याने शालेय विद्यार्थी या अमली पदार्थाच्या अधीन जाऊ लागले आहेत. काही वर्षांपूर्वी पोलिसांना शहरात अमली पदार्थ विकणाऱ्यांची चांगलीच नाकाबंदी केली होती. त्यामुळे हे प्रमाण कमी झाले होते, मात्र आता या टोळींनी पुन्हा उचल खाल्ली आहे.

नवी मुंबईत अनेक भागांत सिडको किंवा पालिकेने रस्ते, पदपथ, उद्याने विकसित केले आहेत. संध्याकाळी सहा-सातनंतर हा भाग शक्यतो निर्जन असल्याचे दिसून येते. त्याचा फायदा ही अमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्या टोळ्या उचलत आहेत. ऐरोली येथील पामबीच विस्तार मार्ग, घणसोली, कोपरखैरणे, वाशी खाडीकिनारे, रात्री दहानंतर बंद होणारी उद्याने, मैदाने ही या अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांची आश्रयस्थाने झाली आहेत.

# कोट्यवधी खर्चूनही खारभूमी नापीक


**अलिबाग-** राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील सहा योजनांसाठी ११४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. या सर्व योजनांचे काम पूर्ण झाल्यावर जिल्ह्यातील २ हजार २१ हेक्टर जमीन भातपिकाखाली येईल, असे स्वप्न दाखवण्यात आले होते; मात्र हे स्वप्नच राहिले आहे.

येथील शेतकऱ्यांना श्रमदानाने बांधबंदिस्तीची कामे करावी लागत आहेत. मान्सूनमधील उधाणाने अलिबाग, मुरूड, पेण तालुक्यांतील खारभूमीच्या बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणात नासधूस झाली असल्याने खारलँड विभागाने केलेला दुरुस्तीचा खर्च पाण्यात गेल्याची प्रतिक्रिया खारेपाटातील शेतकरी व्यक्त करीत आहेत. अनेक वर्षे नापीक राहिलेली अलिबाग, मुरूड, पेण तालुक्यातील खारभूमी या योजनेमुळे सुजलाम् सुफलाम् होईल असे स्वप्न दाखवण्यात आले होते. या सहा योजनांमधून जिल्ह्यातील खारभूमीला ३१.४८ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा सुरक्षित करण्यात आला होता. जागतिक बँकेने दिलेल्या नियोजनानुसार, खारभूमी योजनांचे नूतनीकरण करताना खारभूमी योजनेचा संरक्षक बंधारा हा चारचाकी वाहनांची वर्दळ होऊ शकेल इतक्या रुंदीचा असणे अपेक्षित आहे; मात्र याबाबत योग्य खबरदारी न घेता बांधल्याने हे बंधारे उधाणाच्या तडाख्यात वाहून गेले आहेत. मागील वर्षी मंजूर झालेल्या या निधीचा वापर रायगडमधील बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी करण्यात येत आहे; मात्र



त्याचा कोणताही लाभ येथील शेतकऱ्यांना मिळालेला नाही. अनेक ठिकाणी समुद्रातील खारेपाणी शेतात शिरत असल्याने या वर्षीही या शेतीत सुधारणा झालेली नाही. मान्सूनच्या लाटांचा जोर कमी होताच येथील शेतकऱ्यांनी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीस सुरुवात केली आहे.

# दिवाळी सुट्टीत चोरट्यांचे पोलिसांसमोर आव्हान




**नाशिक-** दिवाळी सणानिमित्ताने काही परगावी तर काही पर्यटनानिमित्ताने शहराबाहेर जातात. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांकडून बंद घरे हेरून घरफोड्या होतात. यापार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये दिवस-रात्रीच्या गस्ती पथकामध्ये वाढ केली जाणार आहे. तसेच, सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीतील कंपन्याही बंद राहत असल्याने याठिकाणीही सातपूर व अंबड पोलीस ठाण्यामार्फत दिवस-रात्र विशेष गस्ती पथकाचे नियोजन करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर निमा-आयमा उद्योजक संघटनांच्या बैठका घेऊन संयुक्त गस्त मोहीम सुट्टीच्या काळात राबविली जाणार आहे.

शाळा- महाविद्यालयांना दिवाळी सणानिमित्ताने सुट्ट्या आहेत. तर, उद्यापासून सातपूर-अंबड औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांनाही येत्या मंगळवारपर्यंत (ता.२९) दिवाळी सुट्टीमुळे बंद राहणार आहेत. त्यापार्श्वभूमीवर बहुतांशी नागरिक हे कुटूंबियांसह परगावी अथवा पर्यटनानिमित्ताने शहराबाहेर जातात. चोरट्यांसाठी हीच सुवर्णसंधी असते. याच काळात चोऱ्या-घरफोड्यांचे प्रमाण वाढते आणि पोलिसांसमोर या चोरट्यांचे मोठे आव्हान आहे.

या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांच्या उपस्थितीमध्ये निमा-आयमा उद्योजक संघटनेसमवेत बैठक झाली. तसेच, पोलीस ठाणेनिहाय चोख बंदोबस्त आणि दिवस-रात्रीच्या गस्तीपथकांचे नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार, दिवस-रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ केली जाणार आहे. अंबड-सातपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कामगार वसाहत अधिक असल्याने चोऱ्यांचे प्रमाण वाढते. औद्योगिक वसाहतीमध्येही कंपन्या बंद असताना चोरटे अंधाराचा फायदा घेऊन कंपनीच्या आवारातील साहित्य चोरून नेण्याचे प्रकार वाढतात. परंतु गेल्या काही वर्षांपासून पोलिसांच्या गस्ती पथकांमुळे चोरीचे प्रमाण घटले आहे. यंदाही त्याचप्रमाणे नियोजन केले आहे. त्याशिवाय नागरी परिसरात फिरते गस्ती पथकांसह दरोडाविरोधी पथक, गुन्हे शाखांचे फिरते पथकही सज्ज राहणार आहेत. त्यासंदर्भात निमा-आयमा या औद्योगिक संघटनांचीही बैठक घेऊन पोलिसातर्फे सुरक्षिततेसंदर्भातील सूचना उद्योजकांना देण्यात आल्या आहेत.

# आब राखून शिवसेना सत्तेत राहील -पवार



**बारामती- विधानसभा निकालामध्ये लोकांनी आम्हाला विरोधात बसण्याची संधी दिली आहे, सरकार बनवायला संधी दिलेली नाही. त्यामुळे आम्ही ते काम प्रभावीपणे करत राहू. भाजप-सेनेचा जो फॉर्म्युला ठरला आहे, त्यानुसार सत्तेत वाटा मिळावा, अशी अपेक्षा उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे मागच्या वेळी सेनेसोबत ज्या घटना घडल्या, ते त्या आता सहन करतील, असे वाटत नाही. आब राखून शिवसेना सत्तेत सहभागी होईल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी व्यक्त केले. विधानसभा निवडणूक निकालानंतर खा. पवार बारामतीत दाखल झाले. यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.**

ते म्हणाले, मुख्यमंत्री व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही लढाईच नाही, लढायला कोणी समोर नाही, असे एकतर्फी चित्र निर्माण केले होते. त्यामुळे लोकांनाही निवडणूक एकतर्फीच वाटत होती. परंतु, आपण ज्यावेळी निवडणूक प्रक्रियेत जातो, त्यावेळी आपली भूमिका प्रभावीपणे मांडली नाही, तर लोकांना दोष देता येणार नाही. ही कमतरता भरून काढण्याचे आव्हान मी स्वीकारले.

निवडणुकीपूर्वी भाजप-सेनेत मोठ्या प्रमाणात झालेले पक्षांतर व साताऱ्यातील उदयनराजेंच्या पक्षांतराबाबत ते म्हणाले, लोकांना पक्षांतर फारसे आवडत नाही. एखाद्या तत्त्वासाठी तुम्ही राजीनामा दिला, तर लोक ते स्वीकारतात. १९५६-५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी काँग्रेसने वेगळी भूमिका घेतली. ती मान्य नसल्याने अनेकांनी पक्षांतर करत संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. त्यावेळी तो इश्यू होता. पण इथे कोणताही इश्यू नसताना केवळ सत्तेत सहभागी व्हायची संधी मिळेल, या भावनेने पक्षांतर झाले. लोकांना ते पटले नसल्याचे पवार म्हणाले.

काही वेगळा फॉर्म्युला वापरून सत्तेत सहभागी होणार का, या प्रश्नावर ते म्हणाले, आम्हाला त्या रस्त्याने जायचे नाही. शेती आणि शेतीचे प्रश्न आमच्यासाठी महत्त्वाचे आहेत. उद्योगधंद्यातले मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्रात ५० टक्के कारखाने बंद पडले आहेत. हजारोंचे रोजगार बुडत आहेत. या प्रश्नांसंबंधी जनमत तयार करणे, त्यांची सोडवणूक करण्यासाठी संघटनात्मक काळजी घेणे, यावर आमचे अधिक लक्ष राहील.

काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांनी राज्यातील निवडणुकीत अधिक लक्ष घातले असते, तर कदाचित चित्र वेगळे दिसले असते का, या प्रश्नावर पवार म्हणाले, सोनिया गांधी यांची प्रकृती बरी नव्हती. त्यामुळे मर्यादा आल्या; पण मी या राज्यातील आहे. त्यामुळे माझी ती जबाबदारी आहे. महाराष्ट्राबरोबर हरियाणाची निवडणूक होती. मी तिथे गेलो का? त्यामुळे असे म्हणून उपयोग नाही. राहुल गांधी यांचा महाराष्ट्र हा बेस नाही. उत्तर प्रदेश हा त्यांचा बेस आहे. त्यांनी यूपीमध्ये कष्ट घेतले. सोनियांनी यूपी आणि हिंदी भाषिक पट्ट्यात कष्ट घेतले. त्याचा त्यांना फायदाही झाला.

# ‘क्यार’ वादळाचा सिंधुदुर्ग किनीरपट्टीला तडाखा

**मुंबई-** क्यार वादळाचा सिंधुदुर्गातील देवगड, मालवण तालुक्यातील समुद्र किनाऱ्याला जोरदार तडाखा बसला आहे. समुद्र किनाऱ्यावर महाकाय लाटा आदळत आहेत. शेकडो नौका देवगड बंदरात दाखल झाल्या आहेत. देवगड तालुक्यातील अनेक गावं पाण्याखाली आहेत. क्यार वादळामुळे काही मच्छिमारांची जाळीही सुमद्रात वाहून गेल्याचं समजतं आहे. भात शेतीत पाणी साचून शेतीचंही मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

अरबी समुद्रात उठलेल्या ‘क्यार’ चक्रीवादळाची तीव्रता वाढत असली तरी ते पश्चिमेला सरकत असल्याचं हवामान विभागानं स्पष्ट केलं आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत वादळी पाऊस होण्याची शक्यता कमी झाली आहे. किनारपट्टी भागातील हवामान रविवारपासून सामान्य होणार असल्याचं हवामान विभागाचे उपमहासंचावक कृष्णानंद होसाळीकर यांनी स्पष्ट केलं आहे.

क्यार चक्रीवादळाचा तडाखा रत्नागिरीच्या किनारपट्टीला देखील बसला. चक्रीवादळामुळे समुद्र चांगलाच खवळला आहे. अजस्त्र लाटांचा मारा किनारपट्टी भागात झाला. रत्नागिरीच्या मांडवी किनारपट्टीतही समुद्राचं पाणी



मानवीवस्तीत घुसलं. तसेच या वादळाचा फटका हा गणपतीपुळे देवस्थानला देखील बसला आहे. गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर, बोर्या बंदर या ठिकाणी देखील लाटांचा मारा अधिक होता. तसेच हर्णे, आंजर्ले आणि दाभोळ किनारपट्टीला देखील याचा फटका बसला आहे. अरबी समुद्रात तयार झालेलं क्यार चक्रीवादळ रायगडच्या दिशेने सरकण्याची शक्यता लक्षात घेऊन किनारपट्टीच्या भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मच्छीमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये तसेच खोल समुद्रात गेलेल्या बोटी परत किनाऱ्यावर आणाव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत. किनारपट्टीवरील नागरिकांनी सतर्क राहावं अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# भाजपाच्या चाणक्यनीतीमुळेच रोहिणी खडसेंचा पराभव

**नाशिक-** विधानसभा निवडणुकीचे निकाल हे एकतर्फी न लागता धक्कादायक म्हणावेत असेच लागले आहेत. अनेक दिग्गजांचा यामध्ये पराभव झाला. त्यात एक महत्त्वाचं नाव होतं ते म्हणजे रोहिणी खडसे. रोहिणी खडसे या एकनाथ खडसेंच्या कन्या आहेत. त्या जळगावातील मुक्ताईनगर मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवली. मात्र बंडखोरी केलेल्या चंद्रकांत पाटील यांनी रोहिणी खडसेंना हरवलं. या पराभवामागे भाजपाची चाणक्यनीती आहे असा आरोप राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी केला आहे. दरम्यान विधानसभा निवडणूक निकालात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. मात्र अबकी बार २०० के पार हा दावा मात्र फोल ठरला आहे. भाजपाला १०५ जागा मिळाल्या आहेत तर शिवसेनेला ५६ जागा. २०१४ च्या तुलनेत शिवसेनेच्या जागा कमी झाल्या आहेत.



मात्र बार्गेनिंग पॉवर वाढली आहे ती शिवसेनेची कारण शिवसेनेच्या टेकूशिवाय भाजपाचा मुख्यमंत्री होऊ शकत नाही.त्यामुळे शिवसेनेची भूमिका या सगळ्याबाबत महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान शिवसेनेचा मुख्यमंत्री करायचा असेल तर राष्ट्रवादीला सोबत घ्या अशी ऑफर भुजबळ यांनी उद्धव ठाकरेंना दिली आहेच. आता पुढे काय काय घडामोडी घडणार ते येत्या काही दिवसात स्पष्ट होईलच.

# बंडखोरांचा फायदा कुणाला, फटका कुणाला, किती बंडखोर विधानसभेत

**मुंबई-** महाराष्ट्र विधानसभेचा निकाल हाती आला असून महायुतीने जरी बाजी मारली असली तरी अपेक्षेप्रमाणे यश त्यांच्या हाती लागलेले नाही. शरद पवारांच्या झंझावातामुळे राष्ट्रवादी आणि महाआघाडीने जोरदार मुसंडी मारली. या निवडणुकीचे एक महत्वाचे वैशिष्टय ठरले ते म्हणजे अनेक ठिकाणी झालेली बंडखोरी. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने वेगवेगळी निवडणूक न लढवता महायुती आणि महाआघाडी करत एकत्रित निवडणूक लढवली. या कारणामुळे अनेक ठिकाणी बंडखोरांचे पेव फुटले. तर काही ठिकाणी पक्षश्रेष्ठींनी डावलल्यामुळे बंडखोरांनी मैदान गाजवले. या बंडखोरांमुळे राज्यात कुठे आणि कुणाला




नुकसान झाले. किती जागांवर बंडखोरांनीच मैदान मारले हे जाणून घेऊयात.

वांद्रे पूर्व मतदारसंघ म्हणजे मातोश्रीच्या अंगणात शिवसेनेला पराभवाचा सामना करावा लागला. शिवसेनेच्या विश्वनाथ महाडेश्वर यांच्या विरोधात शिवसेनेच्या माजी आमदार तृप्ती सावंत यांनी बंडखोरी केली. महाडेश्वर आणि सावंत या दोघांच्या भांडणात काँग्रेसचे झिशान सिद्दिकी फक्त ५ हजार ७९० मतांनी निवडून आले. झिशान सिद्दिकी यांना ३८ हजार ३३७ मतं मिळाली. महाडेश्वरांना ३२ हजार ५४७ तर बंडखोर तृप्ती सावंत यांना २४ हजार ७१ मतं मिळाली. तिथेच एमआयएमच्या उमेदवाराला १२ हजार ५९४ तर मनसेच्या उमेदवाराला १० हजार ६८३ मतं मिळाली.

सोलापूर मध्य मतदारसंघामध्ये काँग्रेसच्या प्रणिती शिंदेंनी एमआयएमच्या हाजी फारुक शाब्दींना १२ हजार ७१९ मतांनी हरवलं. अवघड मानला जात असताना शिवसेनेतील बंडखोरीने त्यांचा विजय सुकर बनवला. शिवसेना बंडखोर महेश कोठे यांनी ३० हजार ८१ मतं मिळाली. तर शिवसेनेच्या दिलीप माने चौथ्या स्थानावर गेले त्यांना २९ हजार २४७ मतं पडली. प्रणिती शिंदेंना ५१ हजार ४४० मतं तर शिवसेनेच्या दोघांना मिळून ५९ हजार ३२८ मतं मिळाली.

बार्शी – ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेत आलेल्या दिलीप सोपल यांना बंडखोर राजेंद्र राऊत यांनी ३ हजार ७६ मतांनी हरवलं. राजेंद्र राऊत यांना ९५ हजार ४८२ मतं पडली तर दिलीप सोपल यांना ९२ हजार ४०६ मतं पडली

दर्यापूर – भाजपचे विद्यमान आमदार रमेश बुंदीले विरूद्ध भाजप बंडखोर सीमा सावळे अशी लढत झाली. यात बंडखोर जावळे पराभूत झाल्या.

धुळे शहर विधानसभा मतदार संघ युतीचे उमेदवार हिलाल माळी यांच्या विरुद्ध भाजप पक्ष सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिलेले अनिल गोटे तसेच राष्ट्रवादीचे बंडखोर माजी आमदार राजवर्धन कदमबांडे अशी लढत होती.

# महायुतीच्या सत्तेत आम्हाला मिळाले पाहिजे कॅबिनेट मंत्रीपद; रामदास आठवले

**नवी दिल्ली–** सध्या झारखंड दौऱ्यावर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे असून त्यांनी या दरम्यान पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबत झालेल्या बैठकीत झारखंडमध्ये पक्षाला आणखी सबळ करण्यासाठीच्या धोरणांवर चर्चा केली. त्याचबरोबर रिपब्लिकन पक्षातर्फे झारखंड येथील आगामी विधानसभा निवडणुकात ३ ते ४ जागांवर निवडणूक लढवण्यासाठी एनडीएकडे मागणी केल्याचे त्यांनी सांगितले. आठवले याकरिता झारखंडचे मुख्यमंत्री रघुवर दास यांना भेटून त्यांच्याशी चर्चा करणार आहेत. तसेच दास यांच्याकडून जर या मुद्द्यावर नकार आला आणि युती नाही झाली तर, पक्ष काही जागांवर निवडणूक लढवणार आणि उर्वरित जागांवर भाजपचे समर्थन करणार



असल्याचे आठवले म्हणाले. रामदास आठवले महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या लागलेल्या निकालाबाबत बोलताना म्हणाले, ५ जागांवरून रिपब्लिकन पक्षाने निवडणूक लढवली होती. आम्हाला त्यातील २ जागांवर विजय मिळाला आहे. महाराष्ट्रात २०० च्या वर जागा युतीला मिळण्याची अपेक्षा होती.

# मराठवाड्यात परतीचा पाऊस; बीड, उस्मानाबाद, परभणी, नांदेडमध्ये जोरदार वृष्टी; पिकांचे नुकसान

परभणी- जिल्ह्यात सहा दिवसांतच तब्बल १४० मि.मी.पाऊस झाल्याने वार्षिक सरासरी गाठण्यास मोठी मदत झाली आहे. रविवारी पहाटेपर्यंत ४४ मि.मी. इतका विक्रमी पाऊस झाला होता. सेलू व पाथरी तालुक्यात अतिवृष्टी झाली होती. नंतर दररोजच थोड्याफार प्रमाणात पावसाने हजेरी लावली. मतदानाच्या दिवशी (दि.२१) पावसाने विश्रांती घेतल्याने मतदार केंद्रापर्यंत पोहोचू शकला. त्यानंतर पुन्हा रात्री पावसाचे आगमन झाले. गुरुवारी मत मोजणीतही दिवसभर पाऊस सुरूच होता. तर रात्री पावसाचा जोर वाढला. सेलूत ७२.४०, पाथरीत ८३.३३ तर मानवत मध्ये ७७.८७ इतका पाऊस झाला. पालममध्ये ५४, पूर्णेत ३०, जिंतुरात ४०.८३, परभणीत २९.२३ तर गंगाखेडमध्ये २३.२५ मि.मी.ची नोंद झाली. जिल्ह्याची वार्षिक सरासरी ७७४.६२ मि.मी. इतकी आहे. आजवर ७६४.३८ मि.मी.पाऊस अपेक्षित असताना ७३६.७४ म्हणजेच ९६.४ टक्के इतका पाऊस झाला आहे. वार्षिक सरासरीशी हे प्रमाण ९५.१ टक्के इतके आहे. शुक्रवारी सायंकाळी पुन्हा पावसाने जोर धरल्याने शनिवारपर्यंत जिल्हा वार्षिक सरासरी ओलांडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर खरिपाच्या पिकांची काढणी सुरू असताना संततधार पावसाने सोयाबीन व कापसाचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासन पीक विमा कंपन्यांकडे बोट दाखवत आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांनी विमा भरलेला नाही. त्यांच्यासमोर या नुकसानीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तथापि, येणाऱ्या उन्हाळ्यातील पाणीप्रश्न काही प्रमाणात मिटणार आहे.



JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers
Udyog Aadhaar Number : MH33A0133630

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)
महा /२०७०/१५ ठाणे संस्था नोंदणी अधिनियम १८६० द्वारा नोंदणी

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)